# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका शाळांना दहावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश - निकालाचा टक्का 90.45%**

मिरा भाईंदर महानगरपालिका शाळांमधील दहावीच्या विद्यार्थ्यांनी यंदाच्या बोर्डाच्या परीक्षेत अत्यंत उल्लेखनीय कामगिरी करत घवघवीत यश मिळवत महापालिकेच्या शाळेतील निकालाचा टक्का 90.45% इतका लागला आहे. यंदा एकूण 241 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून त्यापैकी 218 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. हे यश शाळेतील गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिक्षकांचे परिश्रम आणि विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीचे फलित आहे.

या यशामध्ये विशेष उल्लेखनीय कामगिरी शाळा क्रमांक 04 मधील कुमारी प्रीती गायकवाड हिने केली असून तिने सर्वाधिक 85% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याच शाळेतील कुमारी निर्मला प्रजापती हिने 83.80% गुण मिळवत द्वितीय क्रमांक पटकावला आहे. तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थिनींमध्ये शाळा क्रमांक 03 मधील कुमारी ज्योती शिरसाट आणि शाळा क्रमांक 04 मधील कुमारी भाग्यश्री बंडे यांचा समावेश असून त्यांनी अनुक्रमे 82% गुण मिळवले आहेत. या विद्यार्थिनींच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले आहे. त्यांचे आणि त्यांच्या शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे.  मागील वर्षी निकालाचा टक्का 65% होता, तर यावर्षी तो 90.45% इतका झाल्याने निकालात लक्षणीय वाढ झाली असून, ही महापालिका शाळांच्या गुणवत्तापूर्ण प्रगतीची साक्ष आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबीनोद शर्मा यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले असून त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांनी आपल्या प्रतिक्रियेत सांगितले की, “ही यशोगाथा शिक्षकांच्या परिश्रमांची आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीची आहे. महापालिका शिक्षण विभाग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने नवे उपक्रम राबवत आहे.” मनपा शाळांमध्ये नियमितपणे विविध कला व क्रीडा स्पर्धा घेतल्या जातात. तसेच, बोर्ड परीक्षा व इतर राज्यस्तरीय शैक्षणिक स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले जाते. पालिकेच्या 36 शाळांतील एकूण 97 वर्ग डिजिटल करण्यात आले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दर्जेदार शिक्षण मिळते आहे. शिक्षक वर्ग विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासावर विशेष भर देत असून, विशेष शिक्षण सत्र, वैयक्तिक मार्गदर्शन अशा माध्यमातून विद्यार्थ्यांना सशक्त केले जात आहे. यावर्षी राबविण्यात आलेल्या पालकत्व उपक्रमास  विशेष यश प्राप्त झाले असून, या उपक्रमांतर्गत प्रत्येक शिक्षकाला 8 ते 10 विद्यार्थ्यांचे पालकत्व देण्यात आले होते. यामुळे विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन मिळून त्यांच्या अभ्यासात लक्षणीय प्रगती दिसून आली. हा निकाल आणि यामागील प्रयत्न हे दर्शवतात की, मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण क्षेत्रात सातत्याने प्रगती करत असून विद्यार्थ्यांना केवळ उत्तीर्णच नव्हे तर सक्षम, सुजाण नागरिक बनवण्याच्या दिशेने भक्कम पावले उचलत आहे.